# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम., जी. एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि. ०४.०६.२०२६ रोजी आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मुंबई, यांच्या दालनात सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) उप सचिव तथा सदस्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.

२) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.

३) अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.

४) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई.

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्ये व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत:-

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>मुद्दा</th><th>बैठकीत झालेले निर्णय</th><th>कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय</th></tr>
<tr><td>१</td><td>शै.व.२०२५ - २६ वर्षातील शुल्क मंजूरी प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थाबद्दल चर्चा</td><td>शै.व.२०२५ - २६ ए.एन.एम. व जी.एन.एम. व इतर परिचर्या अभ्यासक्रम महाविद्यालयचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी विहित वेळेत ऑनलाइन प्रस्ताव दाखल न केलेल्या व हार्ड कॉपी सादर न केलेल्या संस्थाच्या विनंती नुसार विशेष अतिरिक्त अंतिम मुदतवाढ व दंडात्मक शुल्क खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुदतवाढ</th><th>दिनांक</th><th>दंडात्मक शुल्क</th></tr>
<tr><td>१.</td><td>विशेष अतिरिक्त अंतिम मुदतवाढ</td><td>दि. ०८/०६/२०२६ ते २२/०६/२०२६ मध्य रात्री १२.०० पर्यंत</td><td>प्रक्रिया शुल्क रु.१५०००/- + दंड रु.२,००,०००/- (प्रति कोर्स )</td></tr>
</table>
</td><td>परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती</td></tr>
</table>

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय |
|---|---|---|---|
| | | सदर विशेष अतिरिक्त अंतिम मुदतवाढ ही फक्त शै.व.२०२५-२६ साठी देण्यात येत आहे, भविष्यात हा संदर्भ लागू करण्यात येणार नाही. वरील विहित वेळेत सादर न केलेल्या संस्थाची,माहिती महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांना सादर करावी व मंडळाने याबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करावी असे मा.अध्यक्षामार्फत सूचित करण्यात आले . | महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

अधिक्षिका,
शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन,
तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष

Scanned with OKEN Scanner